# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

([illegible])

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

[illegible] जि. गडचिरोली ४४२६०५

email :- gug.registrar@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था/२४९९/२०२२

दि.१०/०७/२०२२

## परिपत्रक

**विषय:- पुरपरिस्थितीवर उचित प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून गडचिरोली जिल्ह्यातील महाविद्यालये दि.११ जुलै २०२२ ते १३ जुलै २०२२ या कालावधीत बंद ठेवून संदर्भीय आदेशातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत..**

संदर्भ:- जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली यांचे आदेश क्र.जि.का./क्र.कार्या-3/अका.आव्यप्र/कावि-603/2022 दि.10 जुलै 2022

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत गडचिरोली जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना याद्वारे कळविण्यात येते की, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,गडचिरोली यांचे संदर्भीय आदेशानुसार सध्या मान्सून कालावधी सुरू असून मागील ३ दिवसांपासून गडचिरोली जिल्ह्यात विशेषत: दक्षिण व दक्षिण-पूर्व भागात मुसळधार पाऊसासह अतिवृष्टी झालेली असून गोदावरी, प्राणहिता,वॉडिया,पर्लकोटा,पामुलगौतम, इंद्रावती नद्यांच्या पाण्याची पातळी ही वाढत असून सदर पाणलोट क्षेत्रातील नद्या व नाल्यांना पूर आल्याने प्रतिबंधात्मक बाब म्हणून गडचिरोली जिल्ह्यातील महाविद्यालये दि.११ जुलै २०२२ चे ००.०१ ते १३ जुलै २०२२ चे २४.०० या कालावधीत बंद ठेवून संदर्भीय पत्रातील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

संलग्न:- संदर्भिय आदेश

10.7.2022

(डॉ. अनिल चिताडे )
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी:-

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली
४. मा. प्राचार्य, गडचिरोली जिल्ह्यातील सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.
५. उपकुलसचिव, आस्थापना विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
६. सिस्टीम अॅनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**महाराष्ट्र शासन**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली**
**तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली-४४२६०५**
▸ टोल फ्री क्रमांक :१०७७ ▸ हॉटलाईन क्र.: २००७ ▸ दूरध्वनी क्र.: ०७१३२-२२२०३१/३५/३१,
▸ मोबाईल क्र.: ९४२३९११०७७ ▸ E-mail id :dmcellgadchiroli@gmail.com

सत्यमेव जयते

जि.का./क्र.कार्या-३/अका.आव्यक/कावि- ६०३/२०२२ दिनांक :- १० जुलै, २०२२

# आदेश

**ज्याअर्थी,** सध्या मान्सून कालावधी सुरु असून मागील ३ दिवांपापासून गडचिरोली जिल्ह्यात विशेषत: दक्षिण व दक्षिण-पूर्व भागात मुसळधार पाऊसासह अतिवृष्टी झालेली असून गोदावरी, प्राणहिता, बांडिया, पर्लकोटा, पामुलगौतम, इंद्रावती नद्यांच्या पाण्याची पातळी ही वाढत असून सदर पाणलोट क्षेत्रातील नद्या व नाल्यांना पूर आल्याने बरेच मार्ग बंद आहे.

**ज्याअर्थी,** भारतीय हवामान विभागाचे प्रादेशिक कार्यालय, नागपूर द्वारा आज दि. १० जुलै, २०२२ द्वारा प्रसारित हवामान संदेशानुसार पुढील ७२ तासात गडचिरोली जिल्ह्यात मुसळधार पाऊसासह अत्याधिक पाऊसाची दाट शक्यता आहे.

**त्याअर्थी, मी संजय मीणा, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली** आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अंतर्गत पूरपरिस्थितीवर उचित प्रतिबंधात्मक उपाययोजनेतंर्गत गडचिरोली जिल्हा सीमाक्षेत्रामध्ये पुढीलप्रमाणे उपाययोजना **दिनांक ११ जुलै, २०२२ चे ००.०१ ते १३ जुलै, २०२२ चे २४.०० पर्यंत लागू करीत आहे.**

१) **प्रतिबंधित बाबी :-**

**सदर कालावधीत पुढील सेवा/कामे दिनांक १३ जुलै, २०२२ पर्यंत संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात प्रतिबंधित राहतील.**

i) **जिल्ह्यातील सर्व शाळा, विद्यालये, महाविद्यालये सदर कालावधीत बंद असतील.**
ii) या आदेशान्वये /मार्गदर्शक सूचनांन्वये परवानगी देण्यात आलेल्या आस्थापनांचा अपवाद वगळता इतर सर्व कँटीन (आतिथ्य) सेवा बंद राहतील.
iii) सर्व खाजगी कार्यालये, खाजगी आस्थापना बंद असतील.

२) **खालीलप्रमाणे व्यवसायास परवानगी आहे.**

**सदर कालावधीत अत्यावश्यक सेवेशी संबंधित दुकाने** सुरु राहतील तर इतर दुकाने सदर कालावधीत पूर्णत: बंद असतील. तथापि सर्व दुकानांची आवश्यक उचित खबरदारी घेणेचे जबाबादारी संबंधित दुकानमालकांची असेल.

a. अत्यावश्यक सेवा यामध्ये खालील बाबीचा समावेश असेल.

i. रूग्णालये तपासणी/ निदान केंद्रे, रूग्ण तपासणी केंद्र, वैद्यकीय विमा कार्यालय, औषध निर्माण कार्यशाळा, औषध निर्माण करण्याच्या कंपन्या, औषधी विक्री केंद्र आणि वैद्यकीय क्षेत्राशी निगडीत आस्थापना आणि उपक्रम.
ii. पशुवैद्यकीय बाबी
iii. किराणामाल दुकान, भाजी विक्रीची दुकाने, डेअरी, बेकरी, मिठाई विक्रीची दुकाने, खाद्यपदार्थ विक्री केंद्र.

iv. कोल्ड स्टोरेज आणि वेअरहाऊसिंग सर्विसेस
v. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था- रेल्वे, टॅक्सी, ॲटोरिक्शा, सार्वजनिक वाहतूक बसेस
vi. स्थानिक प्रशासनाद्वारा करावयाची मान्सूनसंबंधी कामे
vii. स्थानिक संस्थाव्दारा पार पाडल्या जाणारी सर्व सार्वजनिक स्वरूपाची कामे
viii. टेलिकॉम क्षेत्राशी निगडीत देखभाल/दुरुस्ती इत्यादी कामे
ix. मालवाहतूक
x. पाणी पुरवठाशी निगडीत सेवा
xi. शेती क्षेत्राशी निगडीत सेवा
xii. ई- कॉमर्स (केवळ अत्यावश्यक सेवेशी संबंधित बाबींना परवानगी असेल)
xiii. प्रसार माध्यमे
xiv. पेट्रोल पंप, इंधन गॅस इ.
xv. स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने अत्यावश्यक म्हणून ठरविलेल्या सेवा/बाबी

**३) सर्व विभागातील विभाग प्रमुखांनी त्यांचे विभागातील १०० टक्के कर्मचारी यांची कार्यालयात उपस्थिती अनिवार्य करावे.**

I. सर्व शासकीय व निम-शासकीय कार्यालये नियमितपणे सुरु असतील.
II. आपत्ती व्यवस्थापनातंर्गत वेळेवेर कोणत्याही विभागाचे मनुष्यबळ लागू शकते. सबब जिल्ह्यातील सर्व शासकीय विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी हे आज दि.१० जुलै, २०२२ चे रात्रौ ११.५९ पर्यंत मुख्यालयी उपस्थित होतील, याची दक्षता घ्यावी.

सदरील आदेशाचे पालन न करणारी/ उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समुह यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ तसेच भारतीय दंड संहिता १८६० नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

**सदरचे आदेश आज दिनांक १०/०७/२०२२ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.**

Office of ... Magistrate ... Gad...

**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली**

**प्रतिलिपी- माहितीस्तव सादर**

१) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
२) मा. प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३) मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
४) मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित**

५) पोलीस अधिक्षक, गडचिरोली
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली
७) अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली/अहेरी
८) उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
९) पोलीस उपविभागीय अधिकारी (सर्व)

१०) जिल्हा शल्य चिकीत्सक,गडचिरोली
११) जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. गडचिरोली
१२) तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
१३) गट विकास अधिकारी (सर्व)
१४) जिल्हा माहिती अधिकारी गडचिरोली यांनी वरीलप्रमाणे बाब विनामुल्य प्रसिद्ध करावी.
१५) जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर पालिका प्रशासन गडचिरोली.
१६) मुख्याधिकारी, नगर परिषदा/ पंचायती सर्व
१७) इतर सर्व संबंधित विभाग ----------
१८) स्थळ प्रत

**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली**